# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५८/२०१२-१३/१०० दिनांक : १२.३.२०१३

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. वैभव जनगोंडा कोथळे (केस क्र. १५८/२०१२-१३)<br>मु.पो. सावळवाडी, ता. मिरज, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. वैभव जनगोंडा कोथळे, मु.पो. सावळवाडी, ता. मिरज, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी उप विभाग विश्रामबाग सांगली यांचेविरुध्द तक्रार दि.२१.११.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहक यांचे अेजी २७९७७०००७१२१ क्रमांकाचे सावळवाडी, ता. मिरज येथे शेतीपंपाचे कनेक्शन आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार पूर्वी वीज मंडळाने कै. आण्णा भाऊ मसुटगे यांना २७९७७०००६२८१ या क्रमांकाचे शेतीपंप वीज कनेक्शन दिलेले आहे. हे कनेक्शन ज्या जागेत होते त्याबाबत तक्रारदार ग्राहकाचा कोणताच आक्षेप नाही व नव्हता, मात्र जानेवारी २०१२ मध्ये सदर कनेक्शनची व मीटर पेटीची मोडतोड झाल्याने श्री.मसुटगे यांच्या वारसांनी वीज मंडळास कोणतीही कल्पना न देता हे कनेक्शन दुरुस्त केलेले आहे व सदरचे कनेक्शन हे अर्जदार यांच्या गट क्र. १८४/१७ सावळवाडी या गटामध्ये अनधिकृतपणे शिफ्ट केलेले आहे. सदरचे कनेक्शन आपल्या गटातून / जमिनीतून हलवावे कारण हे अतिक्रमण आहे असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. त्यासाठी त्यांनी कार्यकारी अभियंता, सांगली, ग्राहक पंचायत, सांगली तसेच शाखा कार्यालयालाही कळविले आहे, तथापि सदरचे कनेक्शन अद्याप हलविले गेले नाही. त्यामुळे ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार क्रमांक ४४ दि. २१.७.२०१२ रोजी दाखल केली. त्यामध्ये अंतर्गत कक्षाचे दि. १७.९.२०१२ व दि. १७.१०.२०१२ ला आदेश झाले. त्याच्या नाराजीने प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दाखल केली. मंचाकडून अपेक्षित मदत - विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ चे पालन करणे बाबत व तक्रारदाराच्या मालकीच्या रानात असलेले कनेक्शन त्वरित काढून टाकणे अथवा शिफ्ट करणेबाबत वि.प.स आदेश द्यावेत.

वितरण कंपनीने आपल्या दि. ११.१२.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदार व श्री. मसुटगे यांचा जागेबद्दलचा वाद हे गाऱ्हाण्याचे मुख्य कारण आहे. सदर बाबतीत जिल्हाधिकारी अथवा तहसिलदार यांच्याकडील कागदपत्रे व श्री. मसुटगे यांचा खुलासा सादर करुन सविस्तर उत्तर देणे आवश्यक असल्याने मंचाकडे दि. १८.१२.२०१२ पर्यंत मुदतची मागणी केली होती. सदर अहवालासोबत गट क्र. १८४ सावळवाडी गावचा नमुना नं. ७, ७अ, १२ चा उतारा जोडला आहे. त्यामध्ये मालकाचे नांव वैभव किरण जनगोंडा कोथळेचा उल्लेख आहे. तसेच उताऱ्यामध्ये इतर अधिकारामध्ये क्र.२ वर " मंजूर क्षेत्रामध्ये ज्यांच्या हिश्यामध्ये विद्युत मोटार येतील त्यांनी व संबंधित विद्युत मोटार मालक यांनी सदर बाब ही समझोत्याने मिटविणेची आहे " अशी नोंद आहे.

सदर तक्रारीची सुनावणी दि. ११.१२.२०१२ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस ग्राहक व ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे हजर. कंपनीतर्फे श्री. व्ही.आर. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हे हजर होते. तक्रारदाराने श्री. मसुटगे यांचे शेतीपंपाचे कनेक्शन पूर्वी जेथे होते, तेथे शिफ्ट करण्याबाबत आदेश व्हावेत अशी मागणी केली.

अंतर्गत कक्ष सांगली यांच्या आदेशाप्रमाणे कनिष्ठ अभियंता, दुधगांव यांनी दि. १२.१२.२०१२ रोजी गाव कामगार तलाठी यांना पत्र लिहिले आहे. श्री. वैभव जिनगोंडा कोथळे यांच्या मालकीच्या गट नं. १८४/१७ मध्ये (पूर्वीचा गट नं. १८४) मध्ये श्री. अण्णा भाऊ मसुटगे यांचे वीज कनेक्शन क्र. २७९७७०००६२८१ हे दि. २१.८.१९८५ रोजी दिले होते. सदर जमीन श्री.कोथळे यांना १९९५ मध्ये पुनर्वसन कायद्यातील तरतुदीनुसार मिळाली असून सदर १८४/१७ च्या उताऱ्यात इतर अधिकारातील अट क्र. २ नुसार मंजूर क्षेत्रामध्ये ज्यांच्या हिश्यामध्ये विद्युत मोटार येतील त्यांनी व संबंधित विद्युत मोटार मालक यांनी सदर बाब ही समझोत्याने मिटविण्याची आहे असे म्हटले आहे. श्री. कोथळे यांच्या तक्रारीनुसार श्री. मसुटगे यांचे सदर कनेक्शन हे अतिक्रमण असल्याचे म्हटले आहे. सदर तक्रारीबाबत गाव कामगार तलाठी यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे कनिष्ठ अभियंता, दुधगांव यांनी कळविले आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांची तक्रार फेटाळणे योग्य होईल काय ?
उत्तर : होय

## कारणमिमांसा

वरील तक्रारीमध्ये ठोस असे कारण दिसत नसून प्रथमदर्शनी तक्रारदाराचे कोणतेही नुकसान वा गैरसोय झाल्याचे दिसून येत नाही. सदर तक्रार ही वैयक्तिक कारणापोटी व दिवाणी स्वरुपाची आहे असे मंचाचे मत झाले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ६.९ ब व क च्या तरतुदीनुसार सदर तक्रार फेटाळणे योग्य होईल. सदर तरतुदीनुसार ग्राहकाच्या तक्रारीची सुनावणी मंचाने घेतली आहे. खालील प्रमाणे आदेश -

## **आदेश**

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही
( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

दिनांक :

श्री. बी. जी. बी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com